✦ धुळे ✦ वर्ष १७ वे ✦ पाने : ४ ✦ किंमत १ रु. RNI NO. MAHMAR /2009/32008 धुळे – नंदुरबार– जळगांव मो.८५३०६०७५८८ मो.९४२३४९५७४८

EMAIL- dailyapalnavrajya@gmail.com AAPALA NAVRAJYA

# आपलं नवराज्य

पत्रकारितेचा वारसा नव्हे वसा संपादक - सुनिल भगवान पाटील

अंक २४७ ✦ सोमवार ६ जुलै २०२६

## मुसळधार पावसाने मुंबईची नाकाबंदी; रस्ते जलमय, लोकल वाहतूकही विस्कळीत

मुंबई : मुसळधार पावसाने शनिवारी मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि पालघर परिसराला अक्षरशः झोडपून काढत जनजीवन विस्कळीत केले. ठिकठिकाणी पाणी साचल्याने प्रमुख रस्ते वाहतुकीसाठी बंद झाले, तर मुंबईची जीवनवाहिनी असलेली उपनगरीय लोकल रेल्वेही संथगतीने धावत असल्याने लाखो प्रवाशांचे हाल झाले. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या रेड अलर्टची प्रचिती देत दिवसभर पावसाने मुंबईकरांची चांगलीच नाकाबंदी केली.

शुक्रवारी मध्यरात्रीनंतर सुरू झालेल्या पावसाने शनिवारी सकाळपर्यंत जोर कायम ठेवला. सकाळी साडेआठपर्यंत मुंबईत १०० मिमीहून अधिक पावसाची नोंद झाली, तर उपनगरांमध्ये पावसाचा अधिक प्रभाव दिसून आला. सकाळी दहा ते दुपारी दोन या कालावधीत झालेल्या मुसळधार सरींमुळे अनेक भाग जलमय झाले.

मुंबई–ठाणे जोडणारा लालबहादूर शास्त्री (एलबीएस) मार्ग शीतल सिग्नल, कमानी सिग्नल, सोनापूर गल्ली आणि विद्याविहार परिसरात पाणी साचल्याने पूर्णपणे ठप्प झाला. कुर्ला–अंधेरी मार्गावरील (पान ४वर)

## ३१८ वर्षांच्या परंपरेत प्रथमच जालन्यात संत मुक्ताई पालखीचा ऐतिहासिक रिंगण सोहळा



### हरिनामाच्या गजरात हजारो वारकऱ्यांची उपस्थिती; भक्तिमय वातावरणाने शहर दुमदुमले

**जालना : तब्बल ३१८ वर्षांची अखंड परंपरा लाभलेल्या संत मुक्ताई पालखी सोहळ्यातील ऐतिहासिक रिंगण सोहळा रविवारी प्रथमच जालना शहरात उत्साहात पार पडला. सकाळी साडेसात वाजता सुरू झालेल्या या सोहळ्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या हजारो वारकऱ्यांनी उपस्थिती लावत भक्ती, श्रद्धा आणि वारकरी परंपरेचा अनोखा संगम अनुभवला.**

शनिवारी संत मुक्ताई पालखीचे जालन्यात आगमन झाल्यानंतर शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. रविवारी रिंगण सोहळा सुरू होताच 'ज्ञानोबा–तुकाराम' आणि **'मुक्ताई माऊली'**च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. टाळ–मृदंगाचा निनाद, हरिनामाचा गजर, अभंगांचे सूर आणि अखंड नामस्मरणाने संपूर्ण वातावरण भक्तिरसात न्हाऊन निघाले.

सोहळ्यात विविध दिंड्या, फडकरी, महिला वारकरी आणि युवकांनी पारंपरिक वेशभूषेत उत्स्फूर्त सहभाग घेतला. हरिपाठ, भजन आणि सामूहिक नामस्मरणातून वारकरी संप्रदायाचा समता, सेवा आणि भक्तीचा संदेश प्रभावीपणे अधोरेखित झाला. पालखीचे दर्शन घेण्यासाठी आणि इतिहासात प्रथमच जालन्यात होत असलेल्या रिंगण सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने सुरक्षा, वाहतूक नियंत्रण, आरोग्य सेवा तसेच पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था केली होती. विविध सामाजिक संस्था आणि स्वयंसेवकांनीही वारकऱ्यांसाठी पिण्याचे पाणी व इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देत सेवाभावाचे दर्शन घडविले.

३१८ वर्षांच्या संत मुक्ताई पालखी परंपरेत प्रथमच जालना येथे झालेला हा रिंगण सोहळा वारकरी संप्रदायाच्या इतिहासातील अविस्मरणीय क्षण ठरला. हजारो भाविकांनी या ऐतिहासिक सोहळ्याचा आनंद घेत भक्ती, श्रद्धा आणि वारकरी संस्कृतीचा दिव्य अनुभव घेतला.

## गुंगीकारक कफसिरप औषधाचा बेकायदेशीर साठा एलसीबीने केला जप्त



धुळे (आपलं नवराज्य) – गुंगीकारक कफसिरप औषधांचा साठा विनापरवाना विक्रीच्या उद्देशाने बाळगणाऱ्यास शिंदखेडा येथे अटक केली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने कारवाई केली. संशयिताविरुद्ध शिंदखेडा पोलिसात गुन्हा दाखल झाला. पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी मानवी मेंदुवर विपरीत परिणाम घडवून आणणाऱ्या गुंगीकारक औषध (कफ सिरप) विनापरवानगी कब्जात बाळगणारे व विक्री करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाईचे निर्देश दिले. पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांनी शुक्रवारी (ता.३) मिळालेल्या माहितीनुसार संशयीत किरण वसंत सकट (रा. मच्छीबाजार, शिरपुर) याच्या कब्जात मानवी मेंदुवर विपरित परिणाम घडवुन आणणाऱ्या गुंगीकारक औषधांच्या बाटल्यांची साठा असल्याचे समजले. चोरटी विक्रीच्या उद्देशाने सुरत येथुन शिंदखेडामार्गे शिरपुर येथे जात असल्याची माहिती मिळाली. या कारवाईसाठी स्थानिक गुन्हे शाखा धुळे येथील पथक रवाना केले. शिंदखेडा येथील कुमरेज फाट्याजवळ सापळा लावला. किरण सकट यास थांबवून त्याच्याकडील दोन बॅगची तपासणी केली. त्यात मानवी मेंदुवर विपरीत परिणाम घडवुन आणणारे गुंगीकारक औषध कफ सिरपच्या बाटल्या मिळाल्या. विनापरवाना विक्रीच्या उद्देशाने बाळगल्याचे चौकशीत निष्पन्न झाले. पोलिसांनी अठरा हजार चारशे रुपयांच्या १६० सीलबंद बाटल्या जप्त केल्या. शिंदखेडा पोलीस ठाण्यात संशयित किरण सकट याच्याविरुद्ध गुंगीकारक औषधी द्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम, औषधी द्रव्य व सौंदर्य प्रसाधन अधिनियम कलम अन्वये गुन्हा दाखल झाला. पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे, सहाय्यक निरीक्षक दीपक ढोके, हवालदार प्रशांत चौधरी, चेतन बोरसे, संतोष हिरे, कमलेश सुर्यवंशी यांनी केली

## आग्रा येथील छापखान्यातून टिईटीचा पेपर फुटला: तीन कर्मचाऱ्यांना अटक

मुंबई (आपलं नवराज्य)– टीईटी पेपरफुटी प्रकरणी विशेष पोलीस पथकाने तीन जणांना अटक केली आहे. ज्या छापखान्यात ही प्रश्नपत्रिका छापली गेली होती त्याच कारखान्यातील हे तिघे कर्मचारी असून त्यांनीच मुख्य सुत्रधार विजेंद्र गुप्ता यास प्रश्नपत्रिका बाहेर काढून दिल्याचे निष्पन्न झाले आहे. मुंबई– नाशिक महामार्गालगतच्या भिवंडीतील डोंगराळ भागात कोनगाव पोलीस ठाण्याच्या पथकाने कारवाई करत टीईटी प्रश्नपत्रिकांच्या प्रती जप्त केल्या होत्या. याचे पडसाद राज्यभर उमटले होते. सरकारने यासाठी विशेष पोलीस तपास पथकाची स्थापना केली होती. आणि याप्रकरणाचा मुख्य सुत्रधार विजेंद्र गुप्ता याची पत्नी सुमनकुमारी गुप्ता, राजीव शाव, आकाश कुमार, धीरज सिंग, सोनू सिंह, मिथुन सिंह, कपिल दहिया अशा सातजणांना आतापर्यंत अटक करण्यात आली होती. मुख्य सुत्रधार विजेंद्र गुप्ता अद्याप फरार आहे. शिक्षक पात्रता परीक्षेची प्रश्नपत्रिकांची छपाईचे कंत्राट माहिम पत्रण प्राव्हेट लिमिटेड कंपनीला देण्यात आले होते. या कंपनीचा छापखाना उत्तरप्रदेशातील आग्रा भागात आहे. येथूनच पेपरफुटल्याचा पोलिसांचा अंदाज होता आणि त्या दिशेने पोलिसांची पथके तपास करीत होती. याच तपासादरम्यान पथकाने नरेशकुमार पुरणचंद महोरे, संजयकुमार सुरेशचंद्र चंद्रा आणि बाबूलाल नारायणसिंह कुशवाहा या तिघांना अटक केली असून हे तिघे छापखान्यातील कामगार आहेत. यातील संजयला काही वर्षांपूर्वी कामावरून काढून टाकण्यात आले होत. तर, नरेशकुमार आणि बाबूलाल हे मात्र कंपनीत कार्यरत होते. या तिघांनी छापखान्यातून प्रश्नपत्रिका काढून विजेंद्रला प्रशपत्रिका दिल्याची बाब तपासात समोर आली आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. या तिघांच्या अटकेमुळे आरोपींचा संख्या दहा इतकी झाली आहे.

## स्वच्छ-सुंदर चोपड्याला खड्ड्यांची माळ; पावसामुळे रस्त्यांची दुरवस्था
## शिवाजी चौक, तपस्वी मारुती पुलावर वाहनधारकांची कसरत; नागरिकांचा संताप





चोपडा (आपलं नवराज्य): पावसामुळे चोपडा शहरातील प्रमुख रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली असून, ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांमुळे वाहनधारक आणि पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. 'स्वच्छ–सुंदर शहर' अशी ओळख असलेल्या चोपड्यात आता खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाल्याने नागरिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच तपस्वी मारुतीजवळील पुलावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. पावसाचे पाणी साचल्यामुळे हे खड्डे दिसून येत नसल्याने वाहनचालकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. भरधाव वाहनांमुळे डबक्यातील पाणी उडून शालेय विद्यार्थी, महिला आणि पादचाऱ्यांचे कपडे खराब होत असून नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

दरम्यान, शहरात सुरू असलेल्या ८६ कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेच्या नळजोडणीच्या कामामुळे अनेक ठिकाणी रस्ते खोदून ठेवण्यात आले आहेत. अनेक ठिकाणी काम पूर्ण झाल्यानंतरही रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आलेली नसल्याने चिखल आणि पिवळ्या मातीमुळे रस्ते धोकादायक बनले आहेत. दुचाकी घसरून अपघात होण्याच्या घटनाही घडत असल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे.

नागरिक नियमितपणे कर भरत असतानाही रस्ते, स्वच्छता आणि पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत सुविधांकडे नगरपरिषद प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप केला जात आहे. विशेषतः पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर तातडीने रस्त्यांची दुरुस्ती करून खड्डे बुजविण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

शहरात वरिष्ठ अधिकारी नसल्याने नगरपरिषदेच्या बांधकाम विभाग आणि पाणीपुरवठा विभागाच्या कामकाजावर परिणाम होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. पावसाळ्यात वाढणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने रस्ते दुरुस्ती, खड्डे बुजविणे आणि पाणीपुरवठा योजनेच्या कामानंतर रस्ते पूर्ववत करण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे.

## पाचोऱ्यात ५ लाखांचा गुटखा जप्त! अन्न सुरक्षा विभाग व स्थानिक पोलीस प्रशासनाची कारवाई



चोपडा(आपलं नवराज्य): पाचोरा शहरात एका चारचाकी वाहनात अवैधरित्या महाराष्ट्र राज्यात प्रतिबंध असलेला गुटखा पान मसाला साठवुन ठेवल्याची गोपनिय माहिती अन्न सुरक्षा विभागास प्राप्त झाल्याने माहिती मिळताच अन्न सुरक्षा अधिकारी यांनी स्थानिक पोलीस प्रशासनाच्या मदतीने घटनास्थळी छापा टाकून ४ लाखाची चारचाकी कार व त्यात ठेवलेला ४ लाख ९८ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करत एका विरुद्ध पाचोरा पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत प्राप्त माहितीनुसार पाचोरा शहरातील पुनगाव रोडवरील आशिर्वाद रेसिडेन्सी येथील रहिवासी प्रशांत चौधरी यांचे घराचे मागच्या बाजूला एका चारचाकी कार (क्रं. एम. एच. १४ जे. एम. ०३३२) मध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंध असलेला गुटखा पान मसाला अवैधरित्या साठवुन ठेवला असल्याची गोपनीय माहिती जळगाव येथील अन्न सुरक्षा अधिकारी किशोर बाविस्कर यांना मिळाली. किशोर बाविस्कर यांनी तातडीने सदरची माहिती पाचोरा पोलिस (पान ४वर)

## पंकज विद्यालयात पालकसभानिमित्त पालकांची भरली शाळा

### राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, नवीन अभ्यासक्रम आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांना मार्गदर्शन



चोपडा(आपलं नवराज्य): पाचोरा शहरात एका चारचाकी वाहनात अवैधरित्या महाराष्ट्र राज्यात प्रतिबंध असलेला गुटखा पान मसाला साठवुन ठेवल्याची गोपनिय माहिती अन्न सुरक्षा विभागास प्राप्त झाल्याने माहिती मिळताच अन्न सुरक्षा अधिकारी यांनी स्थानिक पोलीस प्रशासनाच्या मदतीने घटनास्थळी छापा टाकून ४ लाखाची चारचाकी कार व त्यात ठेवलेला ४ लाख ९८ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करत एका विरुद्ध पाचोरा पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत प्राप्त माहितीनुसार पाचोरा शहरातील पुनगाव रोडवरील आशिर्वाद रेसिडेन्सी येथील रहिवासी प्रशांत चौधरी यांचे घराचे मागच्या बाजूला एका चारचाकी कार (क्रं. एम. एच. १४ जे. एम. ०३३२) मध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंध असलेला गुटखा पान मसाला अवैधरित्या साठवुन ठेवला असल्याची गोपनीय माहिती जळगाव येथील अन्न सुरक्षा अधिकारी किशोर बाविस्कर यांना मिळाली. किशोर बाविस्कर यांनी तातडीने सदरची माहिती पाचोरा पोलिस स्टेशनचे पो. नि. राहुलकुमार पवार यांना देत खाजगी वाहनाने घटनास्थळाकडे धाव घेतली. अन्न सुरक्षा अधिकारी किशोर बाविस्कर यांनी पाचोरा पोलिस स्टेशनचे पो. कॉ. गजानन जोशी, पो. कॉ. बजुसिंग बंजारा यांचेसह घटनास्थळी जावुन वाहनाची तपासणी केली असता त्या कारमधील डिक्कीमध्ये अंमली पदार्थ गुटखा पान मसाल्याच्या गोण्या आढळून आल्या. पथकाने ४ लाख रुपये किंमतीची कार व त्यात ठेवण्यात (पान ४वर)

## अग्रलेख

### महिला शेतकऱ्यांना मान्यता...

शेती आणि संलग्न कार्यात सहभागी असलेल्या महिलांना महिला शेतकरी म्हणून मान्यता देणारे 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक' गुरुवारी विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आले. शेतीच नव्हे तर पशुपालन, मत्स्यपालन, कुक्कुटपालन तसेच इतर शेतीसंलग्न व्यवसायात असलेल्या महिलांना या विधेयकामुळे शेतकरी दर्जा मिळणार आहे. महिलेच्या नावावर सातबारा नसला तरी त्यांना शेतकरी प्रमाणपत्र दिले जाणार असल्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी स्पष्ट केले. भरणे यांनी बुधवारी 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक' विधानसभेत मंजुरीसाठी सादर केले होते. गुरुवारी त्यांनी या विधेयकाचा हेतू आणि उद्देश स्पष्ट केला. शेतजमीन महिलांच्या नावावर करणे हा विधेयकाचा उद्देश नाही, तर कृषिक्षेत्र अथवा शेतीशी संबंधित क्षेत्रात ज्या महिला काम करतात त्यांना स्वत:ची शेतकरी म्हणून ओळख मिळावी हा उद्देश असल्याचे भरणे यांनी सांगितले. हे केवळ शेतकरी प्रमाणपत्र नसेल तर महिला शेतक–यांची स्वतंत्र ओळख निर्माण करून त्यांचे आर्थिक सक्षमीकरण करण्याचा या विधेयकाचा उद्देश आहे.

१५ ते २० टक्क्यांपेक्षाही कमी महिलांची नावे सातबारावर आहेत. ग्रामपंचायत आणि नगरपंचायतीच्या सर्वसाधारण सभेत मान्यता मिळाल्यानंतर महिलांना सहाय्यक कृषी अधिका–याकडून शेतकरी म्हणून प्रमाणपत्र मिळेल. विविध सरकारी योजनांतून महिला शेतक–यांना वित्तपुरवठा उपलब्ध करून देण्याबरोबर त्यांच्यासाठी राज्य महिला शेतकरी निधीची स्थापना केली जाणार आहे. कृषीविषयक अर्थसहाय्य याशिवाय खते, बियाणे, पीक विमा, कृषी उत्पादन बाजारपेठेत पोहोचण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. या विधेयकावरील चर्चेत सहभागी होताना राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जयंत पाटील यांनी शेतकरी पतीच्या नावावरील ५० टक्के शेतजमीन महिलांच्या नावे करण्याची मागणी केली. विधेयकाच्या माध्यमातून महिलांची फसवणूक करू नका, सातबारावर महिलांची नोंद करा. कर्ज देताना वित्तीय संस्था महिला शेतक–यांना विनातारण कर्ज देणार आहेत का? महिला शेतक–यांकडून काय तारण घेणार? असे प्रश्न उपस्थित केले. शिवसेना ठाकरे गटाचे भास्कर जाधव म्हणाले, आपल्या राज्यात शेतकरी होण्यासाठी किमान अर्धा एकर जमीन असली पाहिजे, असा कायदा आहे. त्यामुळे महिलांच्या नावावर जोवर अर्धा एकर शेती नसेल तर त्यांना शेतकरी म्हणून मान्यता मिळत नाही. ज्या महिलांना शेतकरी दर्जा देणार आहात, त्यांना अर्धा एकर जमीन कशी देणार, असा मुद्दा उपस्थित केला. या विधेयकावर विधानसभा सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली.चर्चेत अनेक सदस्यांनी सहभाग नोंदवून आपल्या सूचना व मते मांडली. त्यानंतर हे विधेयक एकमताने मंजूर करण्यात आले. ग्रामीण भागातील लाखो महिला वर्षानुवर्षे शेती आणि शेतीपूरक व्यवसायात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत असल्या, तरी त्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर ओळख मिळत नव्हती. अनेक शासकीय योजनांमध्ये जमिनीच्या मालकीची अट असल्यामुळे प्रत्यक्ष शेती करणा–या महिला विविध लाभांपासून वंचित राहत होत्या. ही दरी दूर करून महिलांना सन्मान, अधिकार आणि समान संधी देण्याच्या उद्देशाने हे सर्वसमावेशक विधेयक तयार करण्यात आले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली कृषी विभागाने हे विधेयक तयार केले आहे. जागतिक महिला शेतकरी वर्षानिमित्त आयोजित संयुक्त बैठकीत महिला शेतक–यांना स्वतंत्र कायदेशीर दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार तज्ज्ञ, कायदेतज्ज्ञ, महिला शेतकरी आणि विविध भागधारकांशी व्यापक चर्चा करून हे विधेयक अंतिम करण्यात आले. महिला शेतकरी ही कुटुंबातील सहाय्यक नाही, तर शेतीच्या विकासाची समान भागीदार आहे. त्यामुळे तिला स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर ओळख, अधिकार आणि शासनाच्या सर्व योजनांचा लाभ मिळणे हा तिचा हक्क आहे. महिलांना शेतकरी म्हणून कायदेशीर बहुमान देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. ही प्रत्येक मराठी माणसासाठी अभिमानाची बाब आहे. महिला शेतकरी सक्षम झाली तर महाराष्ट्रातील कृषी क्षेत्र अधिक सक्षम, समृद्ध आणि आत्मनिर्भर होईल. या कायद्यातील सर्व लाभ केवळ प्रत्यक्ष शेतीशी संबंधित आणि पात्र महिला शेतक–यांनाच मिळणार असून, शेतीशी संबंध नसलेल्या व्यक्तींना या योजनेचा लाभ मिळणार नाही.या विधेयकामुळे आतापर्यंत शेतमजूर किंवा भूमिहीन अशी ओळख असलेल्या लाखो महिलांना प्रथमच स्वतंत्र महिला शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता मिळणार आहे.

# ईएसआय रुग्णालयांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानावर भर; आरोग्यसेवा अधिक सक्षम करण्यासाठी शासनाचे प्रयत्न: ना. प्रकाश आबिटकर

मुंबई(आपलं नवराज्य) : राज्यातील कामगार विमा रुग्णालयांमध्ये (ईएसआय) आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करून आरोग्यसेवा सक्षम, जलद आणि सुलभ करण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील असल्याचे सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.सदस्या मनीषा कायंदे यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य भाई जगताप, प्रसाद लाड, राजीव पोतदार यांनी उपप्रश्न उपस्थित केला होता. त्यास उत्तर देताना ते बोलत होते.मंत्री आबिटकर म्हणाले की, ईएसआय रुग्णालयांमध्ये आधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून कामगारांना त्यांच्या परिसरातच दर्जेदार उपचार मिळावेत, यासाठी शासन कटिबद्ध आहे. एक्स–रे मशीनसह आवश्यक वैद्यकीय सुविधा टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून दिल्या जात आहेत. ईएसआय रुग्णालयांमध्ये रेडिओलॉजिस्टची कमतरता असली तरी रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून उपलब्ध एमबीबीएस डॉक्टरांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्यांच्या माध्यमातून सेवा सुरू करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. ५० पेक्षा अधिक रुग्णसंख्या असलेल्या ईएसआय रुग्णालयांमध्ये सीटी स्कॅन व एमआरआयसारख्या सुविधा उपलब्ध करून रुग्णांना शहरात जाण्याची गरज भासणार नाही.ईएसआय रुग्णालयांतील उपलब्ध पायाभूत सुविधांचा प्रभावी वापर करून कामगारांना अधिकाधिक सुविधा मिळाव्यात, यासाठी सर्व लोकप्रतिनिधींच्या सहभागातून बैठक घेऊन सुधारणा करण्यात येतील. तसेच ईएसआय योजनेअंतर्गत मोफत उपचाराची सुविधा उपलब्ध आहे. या योजनेबाबत व्यापक जनजागृती करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.वैद्यकीय उपकरणांच्या खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता आणि गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल, असे सांगताना मंत्री आबिटकर यांनी केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक असल्यास सार्वजनिक क्षेत्रातील (पीएसयू) संस्थांचाही समावेश करण्याबाबत सकारात्मक विचार केला जाईल.

## अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या जागेचा अंतिम निर्णय केंद्राच्या मंजुरीनंतरच : ना.मंत्री हसन मुश्रीफ

मुंबई (आपलं नवराज्य): अमरावती येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी आलियाबाद येथील जमीन शासनाने निश्चित करून तिचा ताबाही घेतला होता. मात्र, संबंधित जागा वनक्षेत्रात येत असल्याचे निदर्शनास आल्याने हे प्रकरण केंद्र शासनाच्या मंजुरीसाठी पाठविण्यात आले आहे, अशी माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली.अमरावती येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या इमारतीसाठी जागा निश्चित करण्याबाबतचा प्रश्न विधानसभेत सदस्य संजय खोडके यांनी उपस्थित केला. या चर्चेत सदस्य बच्चू कडू, अनिकेत तटकरे यांनी सहभाग घेतला. या प्रश्नांना उत्तर देताना ते बोलत होते. मंत्री मुश्रीफ यांनी सांगितले की, वनविभागाच्या मंजुरीनंतरच या जागेबाबत अंतिम निर्णय होणार असून, तोपर्यंत जागा बदलण्याचा किंवा अन्य पर्यायाचा विचार करता येणार नाही. मुख्यमंत्र्यांच्या समितीने निर्णय घेतल्यानंतर व अंतिम निर्णय झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. ते म्हणाले की, राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या निकषांनुसार वैद्यकीय महाविद्यालयासाठी ५०० खाटांचे रुग्णालय आवश्यक आहे; तसेच प्रत्येक जिल्ह्यात एक वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याचा राज्य शासनाचा निर्णय असल्याने हे महाविद्यालय अमरावती शहर किंवा परिसरातून अन्यत्र हलविणे शक्य नाही.वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम आणि शिक्षण व्यवस्था लवकर सुरू करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही वेगाने करण्यात येत आहे. प्राध्यापक, कंत्राटी कर्मचारी; तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींसोबत बैठक घेऊन प्रलंबित प्रश्न मार्गी लावले जातील, असेही मंत्री हसन मुश्रीफ यांनी नमूद केले.

## राष्ट्रीय बाजार समिती अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल पालकमंत्री ना. जयकुमार रावल यांचा सत्कार




शिरपुर (आपलं नवराज्य): महाराष्ट्र राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री ना. जयकुमार रावल यांची राष्ट्रीय बाजार समिती अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल धुळे भाजपा मा. जिल्हाध्यक्ष तथा नंदुरबार भाजपा जिल्हा प्रभारी बबनराव चौधरी यांनी रविवार (दि. ५ जुलै २०२६) रोजी त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करत हार्दिक शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी धुळे भाजपाचे माजी जिल्हा सरचिटणीस अरुण धोबी, अनुसूचित जाती मोर्चा माजी जिल्हाध्यक्ष प्रताप सरदार, भाजपा भटके–विमुक्त आघाडी प्रदेश उपाध्यक्ष रविंद्र भोई, धुळे भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हा सरचिटणीस संजय आसापुरे तसेच आरपीआय (आठवले गट) युवक प्रदेश सचिव नरेश गवळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी ना. जयकुमार रावल यांना राष्ट्रीय बाजार समिती अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शुभेच्छा देत त्यांच्या भावी कार्यास यश लाभो, अशा सदिच्छा व्यक्त केल्यात.

## गंगामाई महाविद्यालयाचे दोन छात्रसैनिक सैन्यदलात,अग्निवीर हर्षल माळी व ललित पाटील यांचा महाविद्यालयात गुणगौरव





धुळे (आपलं नवराज्य): देशसेवेची प्रेरणा आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर नगाव येथील गंगामाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील दोन छात्रसैनिकांनी मोठे यश मिळवले आहे. महाविद्यालयातील एनसीसी युनिटचे छात्रसैनिक हर्षल गोविंद माळी आणि ललित प्रकाश पाटील यांची नुकत्याच झालेल्या सैन्यदलाच्या भरतीत अग्निवीर म्हणून निवड झाली आहे.

सध्याच्या काळात युवकांमध्ये बेरोजगारी वाढत असताना, पोलीस व सैन्यदलाकडे तरुणांचा कल वाढला आहे. मात्र यासाठी शारीरिक तंदुरुस्ती सोबतच शिस्त आणि चिकाटी आवश्यक असते. महाविद्यालयीन जीवनात मिळणारे एनसीसीचे प्रशिक्षण यासाठी उपयुक्त ठरते, याचा प्रत्यय या निवडीमुळे आला आहे. निवड झाल्यानंतर महाविद्यालयात या दोन्ही विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील होते. यावेळी एनसीचे अधिकारी कॅप्टन डॉ. सुनिल पाटील आणि सीटीओ पूजा देवरे उपस्थित होते.कॅप्टन डॉ. सुनिल पाटील म्हणाले, छात्रसेनेतील कठोर आणि शिस्तबद्ध प्रशिक्षण, दररोजची परेड, शारीरिक कसरत आणि देशभक्तीची शिकवण यामुळेच हर्षल आणि ललित यांना हे यश मिळाले आहे. त्यांनी

(पान ३वर)












दै.आपलं नवराज्य हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक, सुनिल भगवान पाटील यांनी मुद्रक बळीराम भगवान मेहेकरे (पाटील) यांच्या मालकिच्या इंडिया ऑफसेट प्रिंटर्स ई–७२ एम.आय.डी.सी. अवधान, धुळे येथे छापून दै.आपलं नवराज्य कार्यालय, शांताई कॉम्प्लेक्स, क्रांती चौक, चितोड रोड, धुळे येथून प्रकाशित केले. संपादक : सुनिल भगवान पाटील (०२५६२)२४७५१३,२३९०१७ ९४२३४९५७४८ 'Mo.८५३०६०७५८८ email-dailyapalanavrajya@gmail.com

# आरोग्य सेवेत कट प्रॅक्टिस व निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही; ना. प्रकाश आबिटकर

धुळे (आपलं नवराज्य): राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार, पारदर्शक आणि तत्पर आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य यंत्रणेने अधिक जबाबदारीने काम करावे. रुग्णांना जाणीवपूर्वक खासगी रुग्णालयांकडे वळविणे, कट प्रॅक्टिसला प्रोत्साहन देणे किंवा शासकीय यंत्रणेतील उपलब्ध सुविधांकडे दुर्लक्ष करणे कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतले जाणार नाही. अशा प्रकारांमध्ये दोषी आढळणाऱ्या संबंधित अधिकारी, ईएमएस समन्वयक आणि कर्मचाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल असे स्पष्ट निर्देश सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. मंत्रालयातील समिती कक्षात आयोजित या बैठकीसाठी आमदार नरेंद्र भोंडेकर, आमदार महेंद्रशेठ दळवी, आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवाड, उपसंचालक राजेंद्र भालेराव यांच्यासह आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी, ईएमएस समन्वयक तसेच राज्यातील सर्व जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

आरोग्य मंत्री पुढे म्हणाले की, राज्यातील १०८ आणि १०२ रुग्णवाहिका सेवांचा उद्देश गरजू रुग्णांना तातडीने शासकीय रुग्णालयात किंवा महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत मान्यताप्राप्त रुग्णालयात उपचारासाठी पोहोचविणे हा आहे. काही ठिकाणी रुग्णांना जाणीवपूर्वक विशिष्ट खासगी रुग्णालयांमध्ये पाठविल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. या सर्व प्रकरणाचा मागील सहा महिन्यांचा रेफरल डेटा तपासण्यात यावा. ज्या ठिकाणी अनियमितता आढळेल, तेथे संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

राज्यात संस्थात्मक प्रसूतींचे प्रमाण वाढविणे हे आपले सर्वोच्च प्राधान्य आहे. यासाठी आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी आणि संबंधित अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करावे.रुग्णाला अनावश्यकपणे खासगी रुग्णालयात पाठविले जात असल्यास त्याची जबाबदारी निश्चित करण्यात येईल. याबाबत सर्व जिल्ह्यांनी सविस्तर सर्वेक्षण करून अहवाल शासनाकडे सादर करावा.

राज्यातील प्रत्येक शासकीय आरोग्य संस्थेमध्ये दर्जेदार औषधे, स्वच्छता, आवश्यक मनुष्यबळ आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा उपलब्ध राहावी, यासाठी नियमित आणि प्रभावी देखरेख ठेवण्याचे निर्देशही मंत्री आबिटकर यांनी दिले. शासनाने आवश्यक निधी आणि सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतरही कामामध्ये दिरंगाई अथवा निष्काळजीपणा झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

'आरोग्य संवाद यात्रा'च्या माध्यमातून १५ जुन पासून राज्यभर प्रत्यक्ष पाहणी मोहीम राबविण्यात येत असून, उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये तसेच गावपातळीवरील आरोग्य समित्यांच्या कामकाजाची प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करण्यात येणार आहे. या पाहणीदरम्यान आढळणाऱ्या त्रुटींसाठी संबंधित यंत्रणेला जबाबदार धरले जाईल. महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ राज्यातील प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याने या योजनेच्या अंमलबजावणीला गती द्यावी.

गाव, उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामीण रुग्णालय स्तरावरील सर्व आरोग्य समित्या अद्ययावत ठेवण्याचे निर्देश देताना कालबाह्य समित्या कायम ठेवण्याचा प्रकार अजिबात सहन केला जाणार नाही असे आरोग्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. समित्यांमध्ये विद्यमान सरपंच व सदस्यांचा समावेश करून त्यांचे नियमित कामकाज सुरू ठेवणे ही संबंधित जिल्हा प्रशासनाची जबाबदारी आहे.

दर तीन महिन्यांनी आमदारांच्या उपस्थितीत होणाऱ्या जिल्हास्तरीय आरोग्य आढावा बैठकींना सिव्हिल सर्जन आणि जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी स्वत: उपस्थित राहणे बंधनकारक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या बैठकीत लोकप्रतिनिधींमार्फत स्थानिक आरोग्य सेवांच्या गरजा, समस्या आणि अपेक्षा थेट प्रशासनापर्यंत पोहोचतील. या बैठकींचे इतिवृत्त शासनाकडे सादर करण्यात येणार असून त्याआधारे पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

आरोग्य सेवेमध्ये पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य देत राज्यातील प्रत्येक नागरिकाला विश्वासार्ह आणि सक्षम शासकीय आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी संपूर्ण आरोग्य यंत्रणेने संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने काम करावे, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी यावेळी केले.असे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सचिन बोडके यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

## महाराष्ट्र आयकॉन अवार्ड २०२६ ने कैलास चौधरी सन्मानित



धुळे(आपलं नवराज्य) : येथील खान्देश तेली समाज मंडळाचे अध्यक्ष कैलास आधार चौधरी यांना दि हस्ती को-ऑपरेटिव्ह बँक,दोंडाईचा यांचे सौजन्याने निसर्ग मित्र समिती धुळे तर्फे महाराष्ट्र आयकॉन अवॉर्ड २०२६ हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सामाजिक,सांस्कृतिक,धार्मिक क्षेत्रामध्ये विधायक कार्य करून समाज संघटित करण्याच्या कार्याची दखल घेऊन कैलास चौधरी यांना हा सन्मान शुक्रवार दिनांक २६ रोजी दोंडाईचा येथे एका खास समारंभात ना.मा. श्री जयकुमारजी रावल यांच्या हस्ते देण्यात आला.यावेळी व्यासपीठावर अनेक मान्यवर उपस्थित होते.

श्री कैलास चौधरी यांना यापूर्वी महाराष्ट्र शासनाचा शाहू फुले आंबेडकर पुरस्कार तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार,राष्ट्रपिता महात्मा गांधी व्यसनमुक्ती पुरस्कार तसेच अनेक सामाजिक सन्मान मिळालेले आहेत.त्यांना मिळालेल्या सन्मानाबद्दल खान्देश तेली समाज मंडळाच्या वतीने त्यांचा नाशिक येथे विशेष सत्कार करण्यात आला.यावेळी नागपूर येथील सामाजिक कार्यकर्ते श्री दिपक देवरे साहेब,खान्देश तेली समाज मंडळाचे मुख्य सचिव रवींद्र जयराम चौधरी,विभागीय उपाध्यक्ष राजेंद्र माधवराव बागुल,जिल्हा उपाध्यक्ष जयवंत रामदास चौधरी,जळगाव जिल्हा अध्यक्ष सोनू भटू चौधरी,अमळनेर तेली पंचायतचे सदस्य अरुण भाऊ चौधरी,समाज सारथी चंद्रकांत श्रीराम चौधरी,धुळे शहर सचिव किशोर पुंडलिक चौधरी,कार्याध्यक्ष अमोल हिरामण चौधरी,राजेंद्र गणपत चौधरी,उपाध्यक्ष नितीन मोतीलाल चौधरी,गजानन एकनाथ चौधरी,संघटक प्रमोद महादू चौधरी,चैतन्य चौधरी अमळनेर,राजेंद्र नथ्थू चौधरी, गजेंद्र फुलचंद चौधरी,भाऊसाहेब चौधरी वरखेडी,मुकेश नवल चौधरी,प्रवीण भटू चौधरी,कमलेश कैलास चौधरी यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# शिरपूरात मतदार यादींच्या सखोल पुनर्निरीक्षणाला वेग; ३० जुलैपर्यंत बीएलओ घरोघरी

शिरपूर (आपलं नवराज्य): भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार धुळे जिल्ह्यात सुरू असलेल्या मतदार यादींच्या सखोल पुनर्निरीक्षण (SIR-2026) मोहिमेला शिरपूर तालुक्यात वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घरोघरी जाऊन Enumeration Form (EF) चे वाटप व संकलन करत असून, सर्व मतदारांनी आवश्यक कागदपत्रांसह बीएलओंना सहकार्य करावे, असे आवाहन तालुका प्रशासनाने केले आहे.

ईएफ फॉर्म भरून न दिल्यास संबंधित मतदाराचे नाव अंतिम मतदार यादीत समाविष्ट होणार नाही, याची नागरिकांनी विशेष नोंद घ्यावी, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येत आहे. ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत बीएलओ प्रत्येक मतदाराच्या घरी भेट देऊन फॉर्म भरून घेणार आहेत. यासाठी मतदारांनी पासपोर्ट आकाराचा फोटो व आवश्यक कागदपत्रे तयार ठेवावीत, असे प्रशासनाने सांगितले आहे.या मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तलाठी, ग्रामपंचायत अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी, विविध शासकीय विभागांचे कर्मचारी, प्रतिष्ठित नागरिक तसेच आजी-माजी लोकप्रतिनिधी यांनी सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गावपातळीवर जनजागृती, समुपदेशन आणि प्रबोधन करून प्रत्येक पात्र मतदारापर्यंत ही माहिती पोहोचविण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची ठरणार असल्याचे प्रशासनाने नमूद केले.उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि गटविकास अधिकारी यांनी संयुक्तपणे सर्व नागरिकांना आवाहन करताना, ही केवळ निवडणूक प्रक्रिया नसून लोकशाही बळकट करण्यासाठीचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. त्यामुळे प्रत्येक पात्र मतदाराने ईएफ फॉर्म भरून बीएलओंना सहकार्य करावे आणि शिरपूर तालुक्यातील सखोल पुनर्निरीक्षण मोहीम शंभर टक्के यशस्वी करण्यासाठी सहभाग नोंदवावा, असे म्हटले आहे.

## अग्निविर...

(पान २ वरुन)महाविद्यालयाचे आणि गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. सीटीओ पूजा देवरे यांनीही दोन्ही विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आणि इतर विद्यार्थ्यांनी त्यांच्याकडून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले.हर्षल आणि ललित हे दोघेही अतिशय सामान्य आणि शेतकरी कुटुंबातील आहेत. लहानपणापासूनच त्यांचे स्वप्न सैन्यात भरती होण्याचे होते. एनसीसीच्या माध्यमातून मिळालेल्या मार्गदर्शनामुळे ते हे स्वप्न पूर्ण करू शकले.

या यशाबद्दल जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तथा संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे, आमदार राम भदाणे, माजी सभापती ज्ञानज्योती भदाणे आणि प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील यांनी दोन्ही विद्यार्थ्यांचे कौतुक करून समाधान व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, गंगामाई महाविद्यालयातील एनसीसी युनिटने आतापर्यंत अनेक विद्यार्थ्यांना सैन्यदलात पाठवले असून, हे आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे.

या प्रसंगी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हर्षल आणि ललित यांच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांमध्येही सैन्यदलात जाण्याची प्रेरणा निर्माण झाली आहे.

**NAME CHANGE**

I have changed my name
from FIRDOS BI NAIM
AHEMAD SHAIKH
To FIRDOS BI NAIM
AHMAD SHAIKH

**NAME CHANGE**

I have change my name
from Raeesabano
RashidBeg to Raeesabano
RashidBeg Mirza



# डॉ. पा.रा. घोगरे विज्ञान महाविद्यालयाचा क्विक हील फाउंडेशनसोबत सायबर सुरक्षा करार

धुळे (आपलं नवराज्य): वाढत्या सायबर गुन्ह्यांना प्रतिबंध घालण्यासाठी आणि विद्यार्थी तसेच नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या डॉ. पा.रा. घोगरे विज्ञान महाविद्यालय, धुळे आणि क्विक हील फाउंडेशन, पुणे यांच्यात 'सायबर शिक्षा : फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमांतर्गत सामंजस्य करार (एमओयू) करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, हा उपक्रम महाविद्यालयात सलग चौथ्या वर्षी राबविण्यात येत असून, यंदाही सायबर जनजागृतीला नवी दिशा मिळणार आहे.

या उपक्रमांतर्गत नुकतेच पुणे येथे विशेष प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, असोसिएट डायरेक्टर अजय शिर्के, सीएसआर प्रतिनिधी गायत्री केसकर, दीपू सिंग आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सायबर सुरक्षेच्या विविध पैलूंवर मार्गदर्शन केले. तसेच क्विक हीलचे संस्थापक कैलास काटकर आणि संजय काटकर यांच्या संघर्षमय प्रवासातून सामाजिक जबाबदारी, नवोपक्रम आणि डिजिटल सुरक्षिततेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.महाविद्यालयातून प्रा. डॉ. स्वाती बोरसे यांच्या नेतृत्वाखाली सायबर क्लबचे अधिकारी पूजा देवरे, ओम सोनार, नंदिनी सोनवणे आणि हिमांशू रघुवंशी (पान ४वर)










वाचकांना विनम्र सुचना
दै.आपलं नवराज्य
दै.आपलं नवराज्य वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.आपलं नवराज्य कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता. जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.आपलं नवराज्यचे मुद्रक, प्रकाशक,संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

# भाजप युवा मोर्चाच्या 'युवाशक्ती जागर यात्रा'चे धुळ्यात उत्स्फूर्त स्वागत

## आकाश परदेशी यांच्या पुढाकाराने कृष्णराज महाडिक यांचे भव्य स्वागत







धुळे (आपलं नवराज्य): भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांच्या 'युवाशक्ती जागर यात्रा' निमित्त धुळे शहरात भाजप युवा मोर्चाच्या वतीने उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. जिल्हाध्यक्ष आकाश परदेशी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या स्वागत सोहळ्यात छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर कृष्णराज महाडिक यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यानंतर एसएसव्हीपीएस महाविद्यालयात युवा संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात युवकांनी विविध विषयांवर संवाद साधला. तसेच भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात पत्रकार परिषद घेऊन संघटनात्मक उपक्रम आणि युवा मोर्चाच्या आगामी कार्यक्रमांची माहिती देण्यात आली.

यावेळी माजी केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, भाजप जिल्हाध्यक्ष कुणाल पाटील, महापौर मायादेवी परदेशी, उपमहापौर ज्योत्स्ना पाटील, ज्येष्ठ नेते हिरामण गवळी, अल्पा अग्रवाल, माजी महापौर जयश्री अहिरराव, कल्पना महाले, चंद्रकांत सोनार, प्रदीप कर्पे, महिला व बालकल्याण सभापती प्रतिभा चौधरी, भाजप प्रदेश चिटणीस उज्ज्वला ठाकरे, डॉ. सुशील महाजन, भाजप प्रवक्ते शाम पाटील, युवा मोर्चा प्रदेश सचिव रुशाली वाघोळे, नगरसेवक ललित माळी यांच्यासह भाजप व युवा मोर्चाचे पदाधिकारी, महिला मोर्चाच्या पदाधिकारी, नगरसेवक आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

युवाशक्ती जागर यात्रेच्या माध्यमातून युवकांना संघटनात्मक कार्यात सहभागी करून घेणे, सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करणे आणि युवा नेतृत्वाला बळ देणे, हा या दौऱ्यामागील उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले. धुळे शहरातील कार्यकर्त्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे कार्यक्रमाला उत्साहपूर्ण वातावरण लाभले.

# मतदार यादी पुनर्निरीक्षणाबाबत मनसेची महत्त्वपूर्ण बैठक



## बीएलओंसोबत समन्वयाने काम करण्याचा ठराव; बूथस्तरावर सक्रिय होण्याचे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन

धुळे (आपलं नवराज्य): मतदार यादी पुनर्निरीक्षण आणि मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्या कामकाजाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची महत्त्वपूर्ण बैठक रविवारी धुळे येथील पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयात पार पडली. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशानुसार तसेच धुळे जिल्हा संपर्क अध्यक्ष तथा माजी आमदार प्रकाश भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या बैठकीला पक्षाचे राज्य उपाध्यक्ष रावसाहेब कदम प्रमुख उपस्थित होते.

फाशीपूल येथील मनसे जिल्हा मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या बैठकीत मतदार यादी पुनर्निरीक्षण मोहिमेबाबत पक्षाची भूमिका, बीएलओंसोबत समन्वय ठेवून काम करण्याची कार्यपद्धती तसेच बूथस्तरावर संघटन अधिक सक्षम करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

राज्य उपाध्यक्ष रावसाहेब कदम यांनी पक्षाच्या आदेशानुसार पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी प्रत्येक बूथ व प्रत्येक घरापर्यंत पोहोचून मतदारांशी संपर्क वाढवावा, मतदार यादी पुनर्निरीक्षण प्रक्रियेत नागरिकांना आवश्यक सहकार्य करावे आणि संघटनात्मक काम अधिक प्रभावीपणे राबवावे, अशा सूचना दिल्या.

बैठकीचे प्रास्ताविक मनसे धुळे जिल्हाध्यक्ष ड. दुष्यंतराजे राजेन देशमुख यांनी केले. तर आभार प्रदर्शन जिल्हा सचिव अजितसिंह राजपूत यांनी केले. बैठकीत बीएलओंसोबत समन्वयाने कार्य करण्यासह मतदार यादी पुनर्निरीक्षण मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदविण्याचा एकमताने ठराव मंजूर करण्यात आला. या ठरावाचा अहवाल पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाकडे मुंबई येथे पाठविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.यावेळी जिल्हा सचिव अजितसिंह राजपूत, संदीप जडे, धुळे तालुकाध्यक्ष संतोष मिस्तरी, महिला सेना जिल्हाध्यक्ष संध्या पाटील, रस्ते आस्थापना जिल्हा संघटक राजेश दुसाने, जिल्हा सचिव दीपक बच्छाव, तालुका उपाध्यक्ष रामकृष्ण वाघ, शिवाजीराव पाटील, शहर उपाध्यक्ष सतीश पाटील, योगेश सैंदाणे, विभाग अध्यक्ष योगेश वाणी, ईश्वर वाघ, दिनेश निंबोळकर, विजय मिस्तरी यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# नगावच्या गंगामाई महाविद्यालयात वन महोत्सव सप्ताह



धुळे(आपलं नवराज्य) : तालुक्यातील नगाव येथील गंगामाई एज्युकेशन ट्रस्ट संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात 'वन महोत्सव सप्ताह'स मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत चर्चासत्र झाले. वृक्षारोपण मोहिमेचा श्रीगणेशा झाला. विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील अध्यक्षस्थानी होते.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज राज्यस्तरीय 'वनश्री पुरस्कार' प्राप्त निसर्ग मित्र समितीचे संस्थापक डॉ. प्रेमकुमार अहिरे, राज्य महासचिव संतोष पाटील, निवृत्त मुख्याध्यापक आर. एन. पाटील, आर. आर. सोनवणे, धुळे जिल्हाध्यक्ष डी. बी. पाटील, ज्येष्ठ पत्रकार गोपी लांडगे आदी उपस्थित होते. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीचे सदस्य डॉ. एस. के. शेलार यांनी मार्गदर्शन केले. मान्यवरांनी पर्यावरण रक्षण, वृक्ष लागवडीचे महत्त्व व निसर्ग संवर्धनाची काळाची गरज यावर विचार मांडले. एक झाड, एक श्वास हा संदेश देत महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.कार्यक्रमाचे राष्ट्रीय सेवा योजना एककाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. गोविंद पावरा, सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा. सुशीलकुमार शिरसाठ व महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. शारदा मोरे आदींनी संयोजन केले. सूत्रसंचालन डॉ. शारदा मोरे यांनी केले. आभार प्रा. गोविंद पावरा यांनी मानले. आमदार राम भदाणे, जिल्हा परीषदेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब भदाणे व माजी सभापती तथा लोकनियुक्त सरपंच ज्ञानज्योतीमाई भदाणे यांच्या मार्गदर्शनाखाली सप्ताह होत आहे.

## पालकांची शाळा...

(पान १ वरुन)आलेला ४ लाख ९८ हजार रुपये किंमतीचा गुटखा पान मसाला जप्त करत पाचोरा पोलिस स्टेशनमध्ये आणण्यात आले. घटनेप्रकरणी पाचोरा पोलिस स्टेशनमध्ये प्रशांत चौधरी यांचे विरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असुन घटनेचा पुढील तपास पो. नि. राहुलकुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उ.नि. कृष्णा घायाळ हे करीत आहेत. या धडक कारवाईमुळे पाचोरा शहरासह परिसरात अवैधरित्या महाराष्ट्र राज्यात प्रतिबंध असलेल्या गुटखा पान मसाला विक्री व साठवनुक करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

## पाचोऱ्या गुटखा...

(पान १वरुन) स्टेशनचे पो. नि. राहुलकुमार पवार यांना देत खाजगी वाहनाने घटनास्थळाकडे धाव घेतली. अन्न सुरक्षा अधिकारी किशोर बाविस्कर यांनी पाचोरा पोलिस स्टेशनचे पो. कॉ. गजानन जोशी, पो. कॉ. बजुसिंग बंजारा यांचेसह घटनास्थळी जावुन वाहनाची तपासणी केली असता त्या कारमधील डिक्कीमध्ये अंमली पदार्थ गुटखा पान मसाल्याच्या गोण्या आढळून आल्या. पथकाने ४ लाख रुपये किंमतीची कार व त्यात ठेवण्यात आलेला ४ लाख ९८ हजार रुपये किंमतीचा गुटखा पान मसाला जप्त करत पाचोरा पोलिस स्टेशनमध्ये आणण्यात आले. घटनेप्रकरणी पाचोरा पोलिस स्टेशनमध्ये प्रशांत चौधरी यांचे विरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असुन घटनेचा पुढील तपास पो. नि. राहुलकुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उ.नि. कृष्णा घायाळ हे करीत आहेत. या धडक कारवाईमुळे पाचोरा शहरासह परिसरात अवैधरित्या महाराष्ट्र राज्यात प्रतिबंध असलेल्या गुटखा पान मसाला विक्री व साठवनुक करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

## मुंबई जलमय...

(पान १ वरुन)काजूपाडा जोडरस्त्यासह अंधेरी सबवे पाण्याखाली गेला, तर एस. व्ही. रोडवर विलेपार्ले आणि अन्य भागांतही वाहतूक बंद ठेवावी लागली. रस्त्यालगतची गटारे तुडुंब भरून वाहू लागल्याने अनेक वाहनांच्या इंजिनमध्ये पाणी शिरले आणि ती बंद पडली. दरम्यान, शाळा सुटण्याच्या वेळेत अनेक विद्यार्थी आणि पालकांना गुडघाभर पाण्यातून मार्ग काढत घरी जावे लागले. रिक्षा, टॅक्सी, बेस्ट बस आणि खासगी वाहनांची मोठी कोंडी झाल्याने वाहतूक व्यवस्था पूर्णपणे विस्कळीत झाली.भारतीय हवामान विभागाने ५ जुलै रोजी मुंबई, ठाणे आणि पालघर जिल्ह्यांसाठी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे. ६ जुलैसाठी पालघर, रायगड आणि पुणे जिल्ह्यातील घाटमाथा परिसराला रेड अलर्ट, तर मुंबई, ठाणे आणि रत्नागिरी जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. दुपारी ३.२२ वाजता ४.१९ मीटर उंच भरती येण्याचा इशाराही देण्यात आल्याने नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. आपत्कालीन मदतीसाठी महानगरपालिकेचा १९१६ हा हेल्पलाइन क्रमांक उपलब्ध आहे.

## डॉ.पा.रा.घोगरे..

(पान ३ वरुन)यांनी प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले. मागील वर्षीही महाविद्यालय, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत राज्यस्तरीय पुरस्कार पटकावला होता.प्रशिक्षणानंतर महाविद्यालयातून **१६ 'सायबर वॉरियर्स'**ची निवड करण्यात येणार असून, हे विद्यार्थी पुढील दोन महिन्यांत धुळे जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती, सामाजिक संस्था आणि विविध सार्वजनिक ठिकाणी सायबर सुरक्षा जनजागृती अभियान राबविणार आहेत. ऑनलाइन फसवणूक, डिजिटल व्यवहारातील सुरक्षितता, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, ओटीपी आणि बँकिंग फसवणूक यांसारख्या विषयांवर नागरिकांना मार्गदर्शन करून सुरक्षित डिजिटल समाज घडविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहे. संस्थेचे चेअरमन मा. बाबासाहेब कुणाल पाटील तसेच उपाध्यक्ष मा. भैय्यासाहेब एस. टी. पाटील यांनी निवड झालेल्या विद्यार्थी व प्राध्यापकांचे अभिनंदन करत त्यांच्या कार्याचे कौतुक केले.सायबर सुरक्षेबाबत जागरूक नागरिक घडविणे ही आजच्या डिजिटल युगाची गरज असून, समाजपरिवर्तनात विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वाची आहे. धुळे जिल्ह्यात सायबर गुन्ह्यांविरोधात प्रभावी जनजागृती करून सुरक्षित डिजिटल वातावरण निर्माण करण्यासाठी हा उपक्रम निश्चितच मोलाची भूमिका बजावणार आहे.

# सुलवाडे-जामफळ-कनोली उपसा सिंचन योजनेची जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी केली पाहणी



धुळे, (आपलं नवराज्य) : धुळे जिल्ह्यातील महत्त्वाकांक्षी सुलवाडे– जामफळ– कनोली उपसा सिंचन योजनेची जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी आज प्रत्यक्ष पाहणी करून प्रकल्पाच्या कामांचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी प्रकल्पातील विविध कामांची प्रगती, कालव्यांची उभारणी, पंपगृहाची स्थिती, बंदिस्त नलिका पाईपलाईन तसेच प्रलंबित कामांचा सविस्तर आढावा घेतला. संबंधित अधिकाऱ्यांनी कामांच्या सद्यस्थितीबाबत माहिती दिली.

जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी कामांची गुणवत्ता राखून प्रलंबित कामे नियोजित कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला दिल्या. तसेच प्रकल्पाच्या अंमलबजावणीत कोणत्याही प्रकारचा विलंब होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले.

सुलवाडे–जामफळ–कनोली उपसा सिंचन योजना पूर्ण झाल्यानंतर धुळे जिल्ह्यातील मोठ्या क्षेत्राला सिंचनाची सुविधा उपलब्ध होणार असून शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादनात वाढ होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रकल्पाची कामे गतीने आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यावर भर देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी दिल्या.

पाहणीदरम्यान सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन कार्यकारी अभियंता संदीप पवार,लघुपाटबंधारे विभाग धुळे,कार्यकारी अभियंता स्वप्निल गांगुर्डे , तहसीलदार शिंदखेडा नितीन कुमार देवरे, सहाय्यक कार्यकारी अभियंता विक्रम पवार, सहाय्यक अभियंता विशाल खैरनार,संबंधित विभागाचे अधिकारी, अभियंते तसेच प्रकल्पाशी संबंधित अधिकारी उपस्थित होते.

दैनिक ♦

# आपलं नवराज्य

PhonePe

ACCEPTED HERE

Scan & Pay Using PhonePe App

******5748

## शुभेच्छा जाहीरात,
## जाहीर नोटीस, छोट्या जाहीराती,
## टेंडर नोटीस व सर्व प्रकारच्या
## जाहीरात प्रसिद्ध करण्यासाठी
## संपर्क ...

# सुनिल भगवान पाटील

मो.९४२३४९५७४८/मो.८५३०६०७५८८

छापील प्रत मिळविण्यासाठीही
वरील क्रमांकावर संपर्क साधा.

# दै.आपलं नवराज्य

शांताई कॉम्प्लेक्स,
क्रांती चौक, चितोड रोड, धुळे
जिल्हा.धुळे महाराष्ट्र ४२४००१